ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

# उपनिवेशिकता आणि वि-उपनिवेशिकता संकल्पनेचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास

**कृष्णा गावित**

संशोधक विद्यार्थी,

*एस पी डी एम महाविद्यालय, शिरपूर.*

**प्रस्तावना:**

आधुनिक काळ नवनवीन शोध व संकल्पनेचा कालखंड असून या काळात वसाहतवाद सर्वात प्रभावशाली विचारधारा होती. संपूर्ण जगात आपल्याला आजही त्याचे प्रभाव आढळून येतात. वसाहतवादाची सुरुवात पंधराव्या शतकात पोर्तुगाल आणि स्पेन येथील समन्वेक्षकांनी केली. प्रामुख्याने त्यांना भारत व अतिपूर्वेकडील प्रदेशांचा युरोप सोबतच्या व्यापारावर नियंत्रण मिळवण्यासाठी नवीन जलमार्गाचा शोध घ्यावयाचा होता. त्यासाठी विविध प्रयत्न केले जाऊ लागले. इ.स. १४८८ मध्ये दक्षिण आफ्रिका व जलमार्गाचा शोध, इ.स. १४९२ मध्ये अमेरिकेच्या शोध, इ.स. १४९८ मध्ये आफ्रिकेला वळसा घालून भारतात येण्याच्या जलमार्गाचा शोध लागला. त्यानंतर अनेक युरोपियन राष्ट्रांनी व्यापारासाठी व नवीन प्रदेशांवर वसाहती स्थापन करण्यासाठी कंपनी स्थापन करण्यास सुरुवात केली. पोर्तुगीज प्रवासी या सर्वांमध्ये आघाडीवर होते. त्यांनी विविध बेटे दक्षिण अमेरिकेतील ब्राझील, आफ्रिकेचा पश्चिम किनारा, भारतातला काही भाग, आग्नेय आशिया इत्यादी भागात वसाहती स्थापन केल्या. स्पेनने संयुक्त संस्थान अमेरिकेचा भाग, लॅटिन अमेरिका, पनामा, वेस्टइंडीज बेटे प्राप्त केली.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

इ.स. १६०२ मध्ये डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली आणि व्यापाराच्या निमित्ताने पौर्वात्य जगतात एक छोटे साम्राज्यच निर्माण केले. तेव्हा त्यांच्या आधिपत्याखाली बटेव्हिया (जाकार्ता) जावा, माले हे प्रदेश होते. तेथून त्यांनी चीन, जपान, भारत, श्रीलंका, इराण यांबरोबर व्यापारी संबंध जोडले. याच सुमारास इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली (१६००). तिने अमेरिकेनंतर आशिया खंडाकडे लक्ष दिले. फ्रान्सचा सॅम्यूएल द शांप्लेन हा प्रथम कॅनडाला गेला (१६०३) आणि त्याने क्वीबेकचा शोध लावला (१६०८) परंतु फ्रेंच वसाहतीकरणाच्या शर्यतीत तसे एकूण संथच होते. सतराव्या शतकात डच, इंग्रज, फ्रेंच यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील आशियाई व्यापारावर नियंत्रण मिळविले. डचांनी इंडोनेशिया आणि इंग्रजांनी भारत येथे आपले बस्तान बसविले. याशिवाय डच, इंग्रज व फ्रेंच यांनी

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

लॅटिन अमेरिकेतील काही भूप्रदेशांवर वर्चस्व मिळविले. इंग्रज व फ्रेंचांनी कॅनडाचा काही भाग व्यापला. डच, फ्रेंच व इंग्रजांनी विद्यमान अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांवर आपले अधिकार वेगवेगळ्या भूभागांवर प्रस्थापित केले. तेथे इंग्रजांनी प्रथम तेरा वसाहती स्थापन केल्या. फ्रेंच व इंग्रज यांमधील युद्धातून इंग्रजांचे वर्चस्व वाढले. इंग्रजांनी फ्रेंचांच्या बहुतेक सर्व वसाहती घेतल्या.

युरोपियन राष्ट्रांची वसाहतीकरणाची स्पर्धा दिवसेंदिवस वाढू लागली, वैज्ञानिक शोधांमुळे नवनवीन शस्त्रास्त्र निर्मिती होऊ लागली. त्यामुळे या स्पर्धेतून महायुद्धासारख्या घटना घडल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवादाचा सर्वत्र तत्वतः आज अंत झाला असला तरी वसाहती करणातून निर्माण झालेली 'कॉलनीलीटी' अथवा 'उपनिवेशिकता' आजही अश्या प्रदेशात आहे. या विरोधात आज 'डी-कॉलनीलीटी' अथवा 'वि- उपनिवेशिकता' या संकल्पनेचा उदय झालेला असून या दोन्ही संकल्पना ऐतिहासिक दृष्टिकोनातून समजून घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध सादर केला आहे.

**आवश्यकता व उद्देश:**

जगभरात युरोपियन राष्ट्र वसाहतीच्या माध्यमातून साम्राज्य प्रसार करत होते. तेव्हा त्यांनी साम्राज्य स्थापन व बळकट करण्यासाठी युरोपियन समाज किती सभ्य आहे व ज्या प्रदेशावर साम्राज्य स्थापित करावयाचे आहे तेथील लोक, त्यांची संस्कृती कशी मागासलेली आहे. हा समाज युरोपियन येण्यापूर्वी रानटी, असंस्कृत गतीहीन होता. येथे कोणत्याही चांगल्या सामाजिक व राजकीय संस्था विकसित झाल्या नाही त्यामुळे येथे अराजक व दुरावस्था होती, धार्मिक दुराचार होता, व्यवस्था कालबाह्य व अनुपयुक्त आहेत. म्हणून युरोपियन समाज जो बुद्धिनिष्ठ व सुसंस्कृत आहे त्यांची ही जबाबदारी आहे की त्यांनी या असंस्कृत समाजाला सुसंस्कृत करणे, असभ्य समाजाला सभ्य बनवणे हे त्यांचे कर्तव्य ईश्वर दत्त आहे. या विचारधारेला शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करण्यासाठी त्यांनी डार्विनच्या मानवी उत्क्रांतीच्या विचाराचा उपयोग करून वंशवादाला सुरुवात केली. युरोपियन वंश हा श्रेष्ठ आणि बाकीचे वंश हे कनिष्ठ आहेत म्हणून श्वेतवर्णीय समाजावर परमेश्वराने लादलेली ती एक नैतिक जबाबदारी होती असे दर्शवले. रुद्यार्ड किपलिंग यांच्या व्हाईट मेंस बर्डन कवितेतूनही या विचारधारेची माहिती मिळते. युरोपियन राष्ट्रांच्या याच धोरणाला उपनिवेशिकता' असे म्हटले जाऊ शकते. याच्या माध्यमातून उपनिवेशित समाजाला त्यांच्या विचारांना, संस्कृतीला, हीन दर्जाचे ठरवून युरोप केंद्रित विचार, सिद्धांत संस्कृती कशी श्रेष्ठ आहे आणि त्याचा प्रसार वसाहतीकरणाच्या माध्यमातून केला गेला त्याच प्रक्रियेला 'उपनिवेशिकता' असे म्हटले जाते. म्हणून अलीकडे या विरोधात 'वी-उपनिवेशिकता' संकल्पना उदयास आली असून त्या संकल्पनेचा अभ्यास करणे भारतीय संस्कृतीच्या, इतिहासाच्या दृष्टिकोनातून आवश्यक ठरते.

**उद्देश:**

१. 'उपनिवेशिकता' म्हणजे काय अभ्यासणे

२. वी-'उपनिवेशिकता' म्हणजे काय अभ्यासणे

३. भारतीय इतिहास लेखन व ऐतिहासिक दृष्टिकोनातून या संकल्पनेचे महत्त्व ओळखणे.

**वसाहतवाद (Colonialism):**

वसाहतवाद म्हणजे एखाद्या प्रदेशाच्या दुसऱ्या प्रदेशातील लोकांद्वारे जागा बडकावणे तिथे स्वतःच्या वसाहती स्थापन

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023
OPEN ACCESS Original Research Article

करणे, त्या टिकून ठेवणे, त्यांचा विस्तार करणे होय. जमीन नैसर्गिक संसाधने व स्थानिक लोकांचे शोषण करून स्वतःच्या राज्याची समृद्धी वाढवणे हा वसाहतवादाचा उद्देश असतो.

**उपनिवेशिकता (Coloniality):**

अशी प्रक्रिया ज्या प्रक्रियेत वासाहतिक समाजाला मानसिक दृष्ट्या गुलाम बनविले जाते त्यांची संस्कृती आणि विचारधारा यावर संपूर्ण वर्चस्व स्थापन करणे वसाहतिक समाजाला नियंत्रित करून त्यांना वसाहतवादी समाजासारखे बनविणे, त्यांचे विचार लादणे, आणि त्यांचे मूळ अस्तित्व नष्ट करणे म्हणजे उपनिवेशिकता होय.

**वी-उपनिवेशिकता (De-Coloniality):**

पिडीत समाज द्वारा पुन्हा आपली सांस्कृतिक चेतना प्राप्त करणे पुन्हा आपली ओळख निर्माण करणे आपले वर्चस्व स्थापन करणे या प्रयत्नाला वी-उपनिवेशिकता असे म्हणतात. हे एक समाजाच्या, संस्कृतीच्या मूळ प्रकृतीला स्थापन करण्याचे आंदोलन आहे ज्याचे ध्येय आपली संस्कृती व चेतना पुन्हा प्राप्त करणे आहे. याची सुरुवात लॅटिन अमेरिकेत झाली. अनिबल क्विहानो यांनी सर्वप्रथम ही संकल्पना मांडली. त्यांनी शक्तीची उपनिवेशिकता सिद्धांत मांडला. त्यानंतर अनेक विद्वानांनी या संकल्पनेच्या विकासामध्ये योगदान दिले त्याच्यात प्रामुख्याने सिल्विया विंटर, वॉल्टर डी मिग्नोलो, कॅथरीन वॉल्श, नेल्सन मालडोनाडो- ट्रोरेस, आणि रामो ग्रॉस्फोगूएल इत्यादी प्रमुख आहेत.

वरील संकल्पनेचा विचार केला तर वसाहतवाद संकल्पना प्रामुख्याने राजकीय तर उपनिवेशिकता सांस्कृतिक संकल्पना आहे. वि-उपनिवेशिकता या संकल्पनेची उत्पत्ती आपली मूळ ओळख प्राप्त करण्यासाठी झाली. त्यामुळे या संकल्पना एकमेकांशी संबंधित आहे. वसाहतवादाचा खरा परिणाम समजून घेण्यासाठी उपनिवेशिकता समजून घेणे आवश्यक असते आणि उपनिवेशिकता विरोधात वि-उपनिवेशिकता ही शोषित समाजाला आपली ओळख पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी मदत करते. या संकल्पनेची सुरुवात दक्षिण अमेरिकेत झाली तिथल्या मूळ लोकांना मोठ्या प्रमाणावर वसाहतवादाचे परिणाम भोगावे लागत आहे; तेथील लोकसंख्या ही दहा टक्के एवढे राहिली आहे. म्हणून त्या ठिकाणी मूळ संस्कृतीची ओळख नष्ट होऊ नये व आपले वैशिष्ट्य टिकवण्याच्या दृष्टिकोनातून या संकल्पनेची सुरुवात झाली. हळूहळू ही संकल्पना वसाहतवादाचा प्रदीर्घ परिणाम भोगणाऱ्या आफ्रिका आणि आशिया येथील राष्ट्रात प्रसार. सुरू झाला.

**दोन्ही संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास:**

| अ. क्र. | उपनिवेशिकता | वि-उपनिवेशिकता |
|---|---|---|
| १. | युरोप केंद्रीत व्यवस्था | युरोपच्या तार्किकतेचे खंडन |
| २. | युरोपची सार्वभौमिकता | संस्कृती आणि सभ्यता वर आधारित |
| ३. | वंश आणि वंशवाद | वंश आणि वंश भेदभावाला स्थाननाही. |

वसाहतवाद्यांनी जगाचे पश्चिम-पूर्व सभ्य-असभ्य, विज्ञान-अंधविश्वास, तार्किक- अतार्किक, आधुनिक-पारंपारिक, इतिहास-मिथक, असे विभाजन केले. युरोपियन हे

पश्चिमेकडील सभ्य, वैज्ञानिक, तार्किक, आधुनिक आणि ऐतिहासिक समाज होते तर गैर युरोपीय पूर्वेकडील, असभ्य, अंधविश्वासी, अतार्किक, पारंपारिक व मिथकावर आधारित समाज होते. याच तार्किक तेचे खंडन कॉलेजमध्ये करण्यात आले. तसेच युरोपियन हे सर्वश्रेष्ठ असून त्यांचा जन्म सत्ता करण्यासाठीच झाला म्हणून युरोपची सार्वभौमिकता जगावर लादण्याचा प्रयत्न केला. तर वि-उपनिवेशिकता संस्कृती आणि सभ्यता वर आधारित सांस्कृतिक मूल्यांवर भर देते. वसाहत वाद्यांनी जीव विज्ञानाचा आधार घेऊन युरोपियन वंश श्रेष्ठ असून इतर सर्व वंश हे कनिष्ठ आहे असे दर्शविले. तर वि-उपनिवेशिकता वंश आणि वंशभेदभावाला स्थान दिलेले नाही.

भारतातही वसाहतवाद प्रदीर्घ काळ असल्यामुळे भारतावर राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संस्थांवर प्रभाव मोठ्या प्रमाणावर दिसतो. भारतीय इतिहासातलेखनात उपनिवेशिकता हे तत्त्व साम्राज्यवादी लेखन प्रवाहात दिसून येते. त्यामुळे भारतीय इतिहास लेखन करतांना वि-उपनिवेशिकता दृष्टीकोन आवश्यक होऊन जातो. हा दृष्टीकोन भारताला भारतीय दृष्ट्कोन, आफ्रिकेला आफ्रिकन दृष्टीकोन, दक्षिण अमेरिकेला अमेरिकन दृष्टीकोन देतो त्यामुळे वि-उपनिवेशिकता संकल्पना महत्त्वाची ठरते. तसेच संपूर्ण जगाला युरोप केंद्रित, व्यवस्थेला पर्याय उपलब्ध करून देते. या संकल्पनेतून नष्ट होत चाललेल्या मूळ निवासी लोकांच्या संस्कृतीचे जतन करण्याचे कार्य होऊ शकेल. वसाहतवादाने मागास ठरवलेल्या समाजालाही आपले अस्तित्व, अस्मिता जपण्यास पर्याय उपलब्ध करून देते. वि-उपनिवेशिकतेवर भारतीय अनुषंगाने आणखी अभ्यास होणे आवश्यक आहे. कारण भारतीय समाज दक्षिण अमेरिका आणि आफ्रिकेपेक्षा वेगळा आहे.

**संदर्भ साधने:**


1. Aníbal Quijano, 'Coloniality of Power, Eurocentrism and Latin America', Nepantla: Views from the South, 2000 pg.533-580
2. Aníbal Quijano, 'Coloniality and Modernity/Rationality', Cultural Studies, 2007
3. Walter D. Mignolo and Catherine E. Walsh, On Decoloniality: Concepts, Analytics, Praxis, London: Duke University Press, 2018.
4. W. Mignolo, The Idea of Latin America, Oxford: Blackwell Publishers, २००५.
5. J. Sai Deepak, India That is Bharat Coloniality, Culture, Constitute: Bloomsbury Publishing, 2021
6. Hull George Some Pitfalls of Decoloniality theory: The Thinker Vol.89/2021



***Cite this Article:***

Gavit K. (2023). ***उपनिवेशिकता आणि वि-उपनिवेशिकता संकल्पनेचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास,*** In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 350–353). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464698